महाराष्ट्र शासन
सांस्कृतिक कार्य संचालनालय

जुने सचिवालय, पहिला मजला, विस्तार भवन, महात्मा गांधी मार्ग, मुंबई ४०० ०३२
वेबसाईट: www.mahasanskruti.org ई-मेल :dcamandhan@gmail.com
दूरध्वनी क्र ०२२: २२८४२६७०/३४ , २२०४३५५०/७१

---

जा.क्र.सां.का.सं/मानधन/२०२५-२६/ २४१३ दिनांक 30 JUL 2026

प्रति,

उप मुख्य कार्यकारी अधिकारी,
तथा सदस्य सचिव,
राजर्षी शाहू महाराज ज्येष्ठ साहित्यिक व कलावंत यांना मानधन सन्मान योजना निवड समिती.
जिल्हा : सर्व जिल्हे

विषय : राजर्षी शाहू महाराज ज्येष्ठ साहित्यिक व कलावंत यांना मानधन सन्मान योजना ऑनलाईन अर्ज करण्याची मुदत वाढविण्यात आल्याबाबत .

संदर्भ : शा.नि.क्र.वृकमा.४३२१(१५)/प्र.क्र.१४५/सां.का.४,दिनांक १६ मार्च २०२४

**महोदय,**

उपरोक्त संदर्भाधीन शासन निर्णयान्वये राजर्षी शाहू महाराज ज्येष्ठ साहित्यिक व कलावंत यांना मानधन सन्मान योजना सांस्कृतिक कार्य संचालनालयामार्फत संपूर्ण राज्यात राबविण्यात येत आहे. सदर योजना दिनांक १ जुलै २०२६ पासून आपले सरकार पोर्टलवर महाराष्ट्र राज्य सेवा हक्क अधिनियम अंतर्गत कार्यान्वित करण्यात आली असून, या योजनेसाठी ऑनलाईन अर्ज सादर करण्याची अंतिम मुदत ३१ जुलै २०२६ निश्चित करण्यात आली होती.

सद्यस्थितीत राज्यभरातील मोठ्या संख्येने साहित्यिक व कलावंत ऑनलाईन अर्ज सादर करीत असल्यामुळे पोर्टलवर तांत्रिक अडचणी निर्माण होत आहेत. परिणामी अनेक पात्र अर्जदारांना अर्ज सादर करताना अडथळे येत असल्याच्या तक्रार या कार्यालयास प्राप्त झाल्या आहेत.

सदर बाबीचा विचार करून, पात्र साहित्यिक व कलावंतांच्या सोयीसाठी या योजनेअंतर्गत ऑनलाईन अर्ज सादर करण्यास **१५ (पंधरा) दिवसांची मुदतवाढ** देण्यात आली असून, आता अर्ज **दिनांक १५ ऑगस्ट २०२६** पर्यंत सादर करता येतील.

सदर मुदतवाढीची माहिती व्यापकपणे उपलब्ध करून देण्यासाठी **जिल्हा माहिती कार्यालयामार्फत वृत्तपत्रे, प्रसारमाध्यमे तसेच समाजमाध्यमांद्वारे प्रसिद्धी देण्यात यावी**, ही विनंती.

आपला विश्वासू

सहायक संचालक

सांस्कृतिक कार्य संचालनालय, मुंबई